Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार

१६.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### सुटकेसमध्ये कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिक शहरात एक अत्यंत खळबळजनक घटना घडली आहे. शहरातील तपोवन परिसरात एका सुटकेसमध्ये कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. एकीकडे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसरात विकासकामांची जोरदार रेलचेल सुरू असतानाच दुसरीकडे आज ही धक्कादायक घटना घडली आहे. केवडी बन परिसरात असलेल्या कृषी गो सेवा ट्रस्ट गोशाळेजवळ एका सुटकेसमध्ये आणि गोणीत अत्यंत क्रूरपणे भरून ठेवलेला दुर्गंधीयुक्त मृतदेह आढळला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. आज सकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला.

## निट-यूजी २०२६ परीक्षेपूर्वी सरकारचा मोठा निर्णय!

### पेपरफुटी रोखण्यासाठी टेलिग्रामवर तात्पुरती बंदी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – निट-यूजी २०२६ पुनर्परीक्षेपूर्वी पेपरफुटी आणि ऑनलाइन फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने भारतात टेलिग्रामच्या वापरावर तात्पुरते निर्बंध लावण्याचा निर्णय घेतला असून, ही बंदी २२ जूनपर्यंत लागू राहणार आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) ने या निर्णयाचे स्वागत करत, विद्यार्थ्यांना दिशाभूल करणाऱ्या आणि पेपरफुटीच्या अफवा पसरवणाऱ्या संघटित रॅकेट्सविरोधातील ही आवश्यक कारवाई असल्याचे म्हटले आहे. निट-यूजी २०२६ ची पुनर्परीक्षा २१ जून रोजी होणार आहे.




एनटीएच्या शिफारशी नुसार केंद्र सरकारने टेलिग्रामवरील 'मेसेज एडिट' (संदेश संपादन) हे फीचरही ३० जूनपर्यंत भारतात बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. या फीचरचा गैरवापर करून काही चॅनेल्स आणि ग्रुप्सकडून परीक्षा संपल्यानंतर जुन्या पोस्टमध्ये प्रश्नपत्रिका जोडून त्या आधीच लीक झाल्याचा खोटा दावा केला जात असल्याचे एनटीएने स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, काही टेलिग्राम चॅनेल्स परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका मिळवून देण्याचे आमिष दाखवत विद्यार्थ्यांकडून हजारो ते लाखो रुपये उकळत होते. एनटीएने अशा सर्व दाव्यांना फसवणूक ठरवत विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. या कारवाईत केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीतील इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर (आय४सी) ची महत्त्वाची भूमिका असल्याचे एनटीने सांगितले. यापूर्वीच अनेक बनावट टेलिग्राम चॅनेल्स, ग्रुप्स आणि बॉट्स हटवण्यात आले आहेत.

दरम्यान, बिहार पोलिसांनीही विद्यार्थ्यांना पेपरफुटीच्या अफवांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे. तपासात या टोळीने सुमारे १.५ कोटी रुपयांचे व्यवहार केल्याची माहिती समोर आली आहे.

एनटीएने स्पष्ट केले आहे की, नीट प्रश्नपत्रिका सुरक्षित यंत्रणेबाहेर उपलब्ध नसते आणि सोशल मीडिया किंवा मेसेजिंग ॲप्सवर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही पेपरफुटीच्या दाव्यांवर विश्वास ठेवू नये. विद्यार्थ्यांनी परीक्षा संदर्भातील माहिती केवळ एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावरून आणि अधिकृत घोषणांमधूनच घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवड हादरले : मणक्याचे ऑपरेशन झालेल्या महिलेचा डॉक्टराकडूनच विनयभंग!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना पिंपरी-चिंचवडमधील आकुर्डी येथे उघडकीस आली आहे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या एका ३७ वर्षीय महिलेचा चक्क उपचार करणाऱ्या डॉक्टरानेच विनयभंग केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणी निगडी पोलिसांनी आरोपी डॉक्टराला बेड्या ठोकल्या आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला पाठीच्या मणक्याच्या उपचारासाठी ८ जून रोजी आकुर्डीतील 'चेतना रुग्णालयात' दाखल झाली होती. ११ जून रोजी महिलेवर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. महिला रुग्णालयातच उपचार घेत असताना १४ जून रोजी पहाटेच्या सुमारास डॉ.धैर्यशील शेटके याने महिलेच्या वार्डमध्ये प्रवेश केला. यावेळी पीडित महिला आपल्या पतीसोबत होती.

उपचाराच्या बहाण्याने जवळ आलेल्या डॉक्टरने महिलेसोबत गैरवर्तन करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने आरडाओरडा केला. महिलेचा आवाज ऐकून तिथे उपस्थित असलेल्या पतीला धक्काच बसला. त्यानंतर महिलेच्या पतीने तात्काळ या प्रकाराची माहिती निगडी पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच निगडी पोलिसांनी तात्काळ रुग्णालय गाठले आणि पीडित महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी डॉ.धैर्यशील शेटके याला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

समाजात संताप 'डॉक्टरांना देवाचे दुसरे रूप मानले जाते', असे म्हटले जाते. मात्र, अशाच एका 'देवरूपी' डॉक्टराकडून रुग्णाचे शोषण झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. रुग्णालयासारख्या सुरक्षित ठिकाणी आणि स्वतःच्या पतीसमोरच असा प्रकार घडल्याने रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## आता प्रत्येक ५० किलोमीटरवर 'आरटीओ ऑफिस'

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

### कमी लोकसंख्येच्या ठिकाणी चार तालुक्यांना एकत्र सेवा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील वाढती वाहनसंख्या आणि नागरिकांची गरज लक्षात घेऊन परिवहन व्यवस्थेचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

नागरिकांना वाहन नोंदणी, परवाना (लायसन्स) आणि इतर सेवांसाठी आता लांबचा प्रवास करावा लागणार नाही. विद्यमान परिवहन कार्यालयापासून ५० किलोमीटरपेक्षा अधिक



अंतर असलेल्या भागांमध्ये प्राधान्याने नवीन प्रादेशिक (आरटीओ) व उपप्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन केली जाणार आहेत. कमी लोकसंख्या असलेल्या दुर्गम भागांतही सेवा मिळावी, यासाठी किमान चार तालुके एकत्र करून नवीन कार्यालय देण्याचे नवे धोरणात्मक निकष परिवहन विभागाने निश्चित केले आहेत. राज्यातील नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा अधिक जलद, सुलभ आणि त्यांच्या घराच्या जवळ उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी परिवहन विभागाने नियुक्त केलेल्या एका तज्ज्ञ समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला असून, त्यामधील शिफारसींना तत्त्वतः मान्यता देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. या नव्या धोरणामुळे राज्यातील दुर्गम तसेच झपाट्याने वाढणाऱ्या शहरी भागांतील वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रशासकीय सुलभता आणि आर्थिक गणिते पाळण्यासाठी समितीने काही निकष ठरवले आहेत. त्यानुसार, नवीन प्रादेशिक किंवा उपप्रादेशिक कार्यालय स्थापन करण्यासाठी काही बाबी निश्चित करण्यात आल्या आहेत.

## पंतप्रधान मोदींना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च सन्मान

### ३३ देशांकडून मिळालेल्या पुरस्कारांच्या यादीत आणखी एका देशाची भर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ब्रातिस्लावा** – भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस (प्रथम श्रेणी)' प्रदान करण्यात आला आहे. स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांनी सोमवारी (१५ जून २०२६) राजधानी ब्रातिस्लावा येथे हा सन्मान पंतप्रधान मोदींना प्रदान केला.



हा सन्मान स्वीकारल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी स्लोव्हाकिया सरकार आणि तेथील जनतेचे आभार मानले. त्यांनी या गौरवाला भारत आणि स्लोव्हाकिया यांच्यातील दृढ आणि दीर्घकालीन मैत्रीला समर्पित केल्याचे सांगितले. असेही त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले. या पुरस्कारासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जगातील ३३ देशांकडून सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याची नोंद झाली आहे. याआधी ३२ देशांनी त्यांना अशा प्रकारचे सन्मान प्रदान केले आहेत. दरम्यान, स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांनीही मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक केले. त्यांनी भारतातील राजकीय स्थैर्य आणि सलग १२ वर्षे पंतप्रधानपद भूषवण्याच्या मोदींच्या कामगिरीला राजकीय चमत्कार असे संबोधले.

## रोजगार सेवकाने मारला शेतकऱ्याच्या पैशावर डल्ला

### रोहयोच्या रकमेची परस्पर उचल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील चांदस येथील शेतकरी शुभम सुरेशराव दवंडे यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या रोहयो फळबाग योजनेत चांदस येथील रोजगार सेवक रुपेश बारस्कर याने पदाचा गैरवापर करून त्यांच्या शेतात काम न करता स्वतःची पत्नी, आई आणि इतर दोन जवळच्या व्यक्तींच्या नावे खोटी मस्टर भरली.

कामगारांच्या जागी आपल्याच नातेवाईकांची नावे टाकून पैशांची परस्पर उचल केली. हा भ्रष्टाचार असून गरिबांच्या हक्कावर गदा आणणारा प्रकार असल्याने संबंधित प्रशासनाने या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन दोषी रोजगार सेवकावर तात्काळ करुन दोषी रोजगार सेवकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी शुभम दवंडे यांनी केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, शुभमचे वडील सुरेश संतोषराव दवंडे यांच्या नावाने रोहयो मधुन २०२२ मध्ये मग्रारोहयो अंतर्गत कृषि विभागामार्फत फळबाग लागवड मंजुर झाली. परंतु फळबाग लागवड करण्याकरिता शुभमने दिलेले अकुशल मजुराचे जॉबकार्डन लावता रोजगार सेवकाने त्यांची आई, पत्नी व जवळचे दोन व्यक्ती यांचे कामावर हजेरी पट ८ नोव्हेंबर २०२२ ते १९ मार्च २०२५ पर्यंत मस्टर भरुन जिओटॅग व ऑनलाइन करुन त्यांच्या खात्यामध्ये पैशांची उचल केली.

हा भ्रष्टाचार असून गरिबांच्या हक्कावर गदा आणणारा प्रकार असल्याने संबंधित प्रशासनाने या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन दोषी रोजगार सेवकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी शुभम दवंडे यांनी केली आहे.



# जयपूरमध्ये दीपकेंना मारहाण : हल्ला करणाऱ्यांना दीपकेंच्या समर्थकांकडून बेदम चोप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**जयपूर** – नीट फेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी याबाबतच्या समस्यांविरोधात आंदोलन पुकारणारे कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांच्यावर सोमवारी जयपूरमध्ये आंदोलनादरम्यान दोन तरुणांनी हल्ला करीत दीपके यांच्या श्रीमुखात भडकावण्याची घटना घडली.

त्यानंतर पक्षाच्या समर्थकांनी त्या दोघांना पकडून बेदम चोप दिला. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

अभिजीत नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी आणि तरुणांशी संबंधित इतर समस्यांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते. अभिजीत यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक शहीद स्मारकावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. आंदोलनादरम्यान, घोषणाबाजीवरून काही तरुणांमध्ये वाद झाला.

पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले. आंदोलनस्थळी अनेक आंदोलकांचे मोबाईल फोनही चोरीला गेले. यानंतर, व्यासपीठावरून आपले मोबाईल फोन आणि सामान सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

जिहादी मानसिकता आंदोलनात सहभागी झालेले तरुण 'मी माझ्या देशावर प्रेम करतो, मी भ्रष्टाचार नाकारतो' आणि 'पेपरफुटी थांबवा' यांसारख्या घोषणा असलेले फलक आणि तिरंगा घेऊन आले होते. काही महिला आपल्या लहान मुलांसोबत आंदोलनात सामील झाल्या.



**वरूड** : श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना रा.कॉ.जिल्हा उपाध्यक्ष समिर गौस अली व न.प.माजी उपाध्यक्ष जमील खान.

# माहिती अधिकार कार्यकर्ता हा नवीन व्यवसाय!

## सुप्रीम कोर्टाची कठोर टिप्पणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – माहिती अधिकार (आरटीआय) कार्यकर्ते असणे हा आता एक नवीन व्यवसाय बनला आहे, अशी कठोर टिप्पणी करीत सर्वोच्च न्यायालयाने एका कथित आरटीआय कार्यकर्त्याला आणि त्याच्या सहकाऱ्याला अटकपूर्व जामीन देण्यास साफ नकार दिला. रस्ता बांधकाम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणल्याचा आरोप या संशयितांवर आहे.

न्या. संदीप मेहता आणि न्या. विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने आरटीआय कार्यकर्ते राकेश कुमार बहल आणि त्यांच्या सहकाऱ्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला. तसेच, रस्ता बांधकामाच्या देखरेखीचे किंवा ते तपासण्याचे अधिकार तुम्हाला कोणी दिले, असा रोखठोक सवालही न्यायालयाने यावेळी उपस्थित केला. न्यायालयाचे निरीक्षण न्यायालयाने म्हटले की, सध्याच्या काळात आरटीआय कार्यकर्ता असण्याला काही लोकांनी चक्क व्यवसायाचे रूप दिले आहे. रस्ता बांधकामाच्या शासकीय कामात ढवळाढवळ करण्याचा किंवा त्याची पडताळणी करण्याचा कायदेशीर अधिकार संबंधित कार्यकर्त्यांना नव्हता, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## एसटी भाडेवाढीला मुदतवाढ

# महामंडळाची १० टक्के भाडेवाढ १५ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत कायम

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – युद्धजन्य परिस्थितीत वाढत्या डिझेल दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवाशांना पुन्हा एकदा झटका दिला आहे. सध्या बससेवांसाठी लागू करण्यात आलेल्या १० टक्के हंगामी भाडेवाढीस आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून वाढीव भाडेदर आता १५ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत कायम राहणार आहेत.


उन्हाळी सुट्टीत होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर महसूलवाढीसाठी १५ एप्रिलपासून लागू करण्यात आलेली ही भाडेवाढ सोमवारी १५ जूनला संपणार होती. मात्र, डिझेलच्या वाढत्या किमती, कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातील वाढ आणि महामंडळावरील आर्थिक ताण लक्षात घेऊन वाढीव दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे साधी आणि मिडी बससेवांसाठी प्रति टप्पा दर ११.०५ रुपये राहणार असून प्रौढांसाठी किमान भाडे १४ रुपये आणि मुलांसाठी ७ रुपये कायम राहणार आहे.

डिझेल दरवाढीचा मोठा फटका एसटी महामंडळाला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेल लागते. राज्यातील डिझेलचा दर सध्या ९७.८३ ते ९९.५० रुपये प्रति लिटर दरम्यान असून त्यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी महामंडळाला दररोज ३३ लाख रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. हा आर्थिक भार महिन्याला १० कोटी रुपये तर वर्षभरात तब्बल १२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

एप्रिलमध्येच ७६ कोटींचा तोटा आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळाला एप्रिल २०२६ या महिन्यात सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. वाढत्या इंधन खर्चामुळे महसूल आणि खर्च यातील तफावत अधिक वाढत असल्याने भाडेवाढ कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

# देशावरून मोसमी ढगच गायब : 'सॅटेलाईट इमेज'मधून मिळाली माहिती : महाराष्ट्रासह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षाच

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांसाठी चिंता वाढवणारे वृत्त समोर आले आहे. 'सॅटेलाईट इमेज'मधून देशातील मोसमी ढग अक्षरशः गायब झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम आहे. भारतात नैऋत्य मोसमी पावसाचा वेग मंदावला आहे. सोमवार, १५ जून रोजीच्या उपग्रह प्रतिमांमध्ये देशाच्या मोठ्या भागावर मोसमी ढगांचा अभाव दिसून आला. हवामान विभागाच्या मते, ४ जून ते १५ जूनदरम्यान देशात सरासरी ५३.७ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु केवळ १९.२ मिमी पाऊस झाला, ज्यामुळे पावसाची ६४ टक्के तूट निर्माण झाली आहे. मोसमी पावसाच्या मंदावण्यामुळे राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह १६ राज्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. दक्षिण भारतातून पुढे सरकल्यानंतर, मोसमी पाऊस महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आसपास थांबला आहे.

# जेजुरी गडावर येळकोटचा गजर...

## ३ लाख भाविकांनी घेतले दर्शन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**पुणे** – महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर सोमवती अमावस्येचा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला.

तब्बल दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आणि त्यातच यंदा 'अधिक मास' असल्याने या यात्रेला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले होते. 'येळकोट येळकोट जय मल्हार' आणि 'सदानंदाचा येळकोट' अशा गगनभेदी जयघोषात सुमारे तीन लाखांहून अधिक भाविकांनी जेजुरीत हजेरी लावून आपल्या कुलदैवताचे दर्शन घेतले. भंडार-खोबऱ्याच्या मुक्त उधळणीमुळे संपूर्ण गड आणि जेजुरी नगरी पिवळीधमक होऊन 'सोन्याची जेजुरी' अवतरल्याचा प्रत्यय येत होता. सोमवती अमावस्येचा पर्वकाळ रविवारी दुपारी १२.२० वाजता सुरू झाला होता आणि तो सोमवारी सकाळी ८.२४ वाजेपर्यंत होता. या मुहूर्ताचे औचित्य साधून ग्रामस्थ, मानकरी आणि खांदेकऱ्यांनी रविवारी मध्यरात्रीनंतर २ वाजता पालखी सोहळा कऱ्हा नदीकडे शाही स्नानासाठी नेण्याचा निर्णय घेतला. रात्री २ वाजता मानकरी पेशवे यांच्या सूचनेनुसार पालखी सोहळ्याने मुख्य मंदिरातून प्रस्थान ठेवले. तत्पूर्वी, देवाचे पुजारी आणि उपाध्ये यांनी खंडोबा-म्हाळसाकांत यांच्या उत्सवमूर्ती विधिवत पालखीत विराजमान केल्या. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर पालखी सोहळा मुख्य प्रवेशद्वारातून गडकोटाबाहेर पडला. हा पालखी सोहळा नंदी चौक, चिंचबागेतील होळकर ट्रस्टचे गौतमेश्वर मंदिर येथे पोहोचला, जिथे होळकरांचा मान स्वीकारण्यात आला. त्यानंतर सोहळा जानाई मंदिर चौक, शहरातील मुख्य शिवाजी महाराज चौक आणि कोथळे मार्गे पुढे सरकला. सोमवारी सकाळी ७ वाजता पालखी कऱ्हा नदीवरील रंभाई शिंपीन स्नान घाटावर पोहोचली. शाहीस्नानानंतर सोमवती अमावस्या यात्रेची सांगता झाली आणि सोहळ्याने माघारीचे प्रस्थान ठेवले. शहरात कुळधर्म-कुलाचाराचे धार्मिक विधी सुरू होते. मार्तंड देव संस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, अभिजित देवकाते, व्यवस्थापक आशिष बाठे यांनी भाविकांना दर्शन सुलभ व्हावे यासाठी चोख नियोजन केले होते.

उत्सवमूर्तींना शाहीस्नान येथे उत्सवमूर्तींना मंत्रोच्चारात विधिवत शाहीस्नान घालण्यात आले. या शाहीस्नानानंतर सोमवती अमावस्या यात्रेची सांगता झाली आणि सोहळ्याने माघारीचे प्रस्थान ठेवले.

# मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात 'आरोग्य संपन्न गाव' मोहिमेअंतर्गत मार्गदर्शन शिबिर संपन्न!

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

*** आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेची माहिती**
*** ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत शस्त्रक्रियांचा लाभ घेण्याचे आवाहन**




**मोर्शी** – ग्रामीण भागातील प्रत्येक गरजू आणि सर्वसामान्य रुग्णांपर्यंत शासकीय आरोग्य योजनांचा लाभ पोहोचावा, या उद्देशाने 'माझगाव आरोग्य संपन्न गाव' मोहिमेअंतर्गत मोर्शी येथे एक विशेष मार्गदर्शन शिबिर पार पडले. सोमवार, दिनांक १५ जून २०२६ रोजी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद उपजिल्हा रुग्णालयाचे माननीय वैद्यकीय अधीक्षक यांनी भूषवले, तर मोर्शीचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.महेशजी जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

आयुष्मान कार्ड आणि उपचारांबाबत सविस्तर मार्गदर्शन उपजिल्हा रुग्णालय मोर्शी व वरुडचे वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम बाबाराव मानकर यांनी मोर्शी तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना या योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागातील लाभार्थी रुग्णांना उपचारादरम्यान कोणत्या सोयी-सुविधा मिळतात, आयुष्मान कार्डचे महत्त्व काय आहे आणि ते कसे उपयुक्त ठरते, याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

सर्वसामान्य व स्त्री रोग शस्त्रक्रिया आता मोर्शीतच! यावेळी मार्गदर्शन करताना तालुक्यातील सर्वसामान्य रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाची माहिती देण्यात आली.

मोर्शी तालुक्यातील लाभार्थी रुग्णांना आता सामान्य शस्त्रक्रिया तसेच स्त्री रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध शस्त्रक्रिया व उपचारांसाठी दूर जाण्याची गरज नाही. या सर्व शस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथेच मोफत व यशस्वीपणे केल्या जातात, अशी माहिती देऊन कर्मचाऱ्यांनी ही माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती या महत्त्वपूर्ण बैठकीला मोर्शी तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये प्रामुख्याने: वैद्यकीय अधिकारी डॉ.तुषार बांबुळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अपेक्षित बागडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.स्मिता जयसिंगकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.कांचन सोनारे, ऑपरेटर, उपजिल्हा रुग्णालय मोर्शी वसीम शेख यांच्यासह तालुक्यातील इतर आरोग्य कर्मचारी व परिचारिका उपस्थित होत्या. या मोहिमेमुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

## संपादकीय

**{ अपयशाला घाबरू नका, ते यशाची पहिली पायरी आहे. }**

### ममता-काँग्रेस समीकरण : राजकीय गरज की नवी दिशा?

भारतीय राजकारणात सध्या विरोधी पक्षांच्या एकजुटीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि काँग्रेस यांच्यातील वाढती जवळीक ही त्याच चर्चेचा भाग आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत काँग्रेसवर कठोर टीका करणाऱ्या ममता बॅनर्जी आता राष्ट्रीय पातळीवर विरोधी ऐक्याच्या बाजूने बोलताना दिसत आहेत. दुसरीकडे, देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसलाही आपली राजकीय ताकद वाढविण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या आधाराची आवश्यकता भासत आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमधील हे समीकरण केवळ राजकीय सोयीचे आहे की भविष्यातील राजकारणाची नवी दिशा, हा प्रश्न उपस्थित होत आहे. ममता बॅनर्जी यांची ओळख देशातील सर्वात लढाऊ आणि आक्रमक नेत्यांपैकी एक अशी आहे. डाव्या आघाडीच्या दीर्घकाळाच्या सत्तेला आव्हान देऊन त्यांनी पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसची सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या वाढत्या प्रभावालाही त्यांनी अनेकदा रोखले. त्यामुळे ममतादीदी या स्वतंत्र आणि स्वबळावर राजकारण करणाऱ्या नेत्या म्हणून ओळखल्या जातात. अशा परिस्थितीत एका निवडणुकीतील पराभवानंतर किंवा राजकीय आव्हानानंतर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर इतर पक्षांचा आधार शोधण्यास सुरुवात केली, असे चित्र निर्माण होत असेल तर ते अनेकांना आश्चर्यकारक वाटू शकते. मात्र, राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, तर हितसंबंध आणि परिस्थिती महत्त्वाची असते. भारतीय जनता पक्षाची राष्ट्रीय स्तरावरील ताकद आणि संघटनात्मक विस्तार लक्षात घेता, स्वतंत्रपणे लढून केंद्रातील सत्तेला आव्हान देणे कोणत्याही एकट्या विरोधी पक्षासाठी सोपे राहिलेले नाही. त्यामुळे विरोधी पक्षांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होणे ही काळाची गरज ठरत आहे. ममता बॅनर्जी यांनाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागत असल्याचे दिसते. दुसरीकडे काँग्रेसची परिस्थितीही फार वेगळी नाही. एकेकाळी देशाच्या राजकारणावर वर्चस्व गाजवणाऱ्या काँग्रेसला गेल्या काही वर्षांत अनेक राज्यांमध्ये मोठे धक्के बसले आहेत. अनेक राज्यांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद कमी झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर प्रमुख विरोधी पक्षाची भूमिका निभावत असताना काँग्रेसला प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याची आवश्यकता भासत आहे. ममता बॅनर्जी, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, द्रमुक यांसारख्या पक्षांचा पाठिंबा मिळाल्यासच भाजपविरोधी व्यापक आघाडी उभारणे शक्य होऊ शकते. याच पार्श्वभूमीवर ममता आणि काँग्रेस यांच्यातील जवळीक समजून घेणे आवश्यक आहे. हे समीकरण विचारसरणीपेक्षा राजकीय गणितावर आधारित असल्याचे दिसते. दोन्ही पक्षांना एकमेकांची गरज आहे. ममतांना राष्ट्रीय राजकारणात आपला प्रभाव वाढवायचा आहे, तर काँग्रेसला विरोधी ऐक्याचा चेहरा म्हणून स्वतःचे स्थान टिकवून ठेवायचे आहे. त्यामुळे परस्पर सहकार्य हा दोघांसाठीही व्यवहार्य पर्याय ठरतो. यासाठी मराठीत एक म्हण योग्य ठरतेङ्ख'सटवाईला नाही नवरा, म्हसोबाला नाही बायको.' म्हणजे दोघांच्याही गरजा अपूर्ण आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी एकमेकांचा आधार घ्यावा लागत आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांचे संबंध काहीसे असेच दिसत आहेत.

# विद्यापीठांपेक्षा कारागृहे झाली उदंड

**कारण वास्तव परिस्थिती धोरणकर्त्यांच्या धोरणांवर अवलंबून असते. धोरणकर्ते कोणत्या वर्गाच्या बाजूचे आहेत, यावरून धोरण (पॉलिसी) ठरत असतात. बहुतांशी अर्थसत्ता ज्यांच्या ताब्यात असते त्यांचा धोरणांवर अधिक प्रभाव असतो. अशावेळी धोरणकर्ते धोरण ठरवताना शिक्षणाकडे कोणत्या हेतूने पाहतात हे महत्त्वाचे असते.**



जर शिक्षण व्यवस्थेकडे मनुष्यबळाचा विकास आणि समाज निर्मितीची भविष्यकालीन गुंतवणूक म्हणून पाहिले तर समाज सुदृढ होईल, पण शिक्षण व्यवस्थेकडे नफा कमविण्याचे साधन म्हणून पाहिले तर शिक्षणातील मूल्य व्यवस्था नष्ट होईल आणि निरोगी समाज निर्मितीचे स्वप्न पूर्णत्वास येणार नाही. समाजातून शिक्षणाचे महत्त्व कमी झाले की गुन्हेगारी वाढते आणि कारागृहांची संख्या वाढवावी लागते. कोरोनाच्या कालखंडानंतर शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आणि कारागृहातील गुन्हेगारांची संख्या वाढली, हे वास्तव ध्यानात ठेवले पाहिजे. २०१४-१५ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये तब्बल एक लाख शाळा बंद झाल्या आहेत, याउलट गुन्हेगारीचा आलेख सतत उंचावत आहे.

भारतात २०२४ अखेरपर्यंत सुमारे एक हजार ३३३ कारागृहे होते. यामध्ये केंद्रीय कारागृहे, जिल्हा कारागृहे, उपकारागृहे, महिला कारागृहे, खुली कारागृहे आणि विशेष कारागृहे यांचा समावेश होतो.

२०२३ च्या आकडेवारीनुसार भारतात एक हजार ३३२ कारागृहे होती, तर २०२४ मध्ये त्यांची संख्या वाढून एक हजार ३३३ झाली. कोरोनाच्या कालखंडानंतर कैद्यांमध्ये सुद्धा वाढ झाली आहे. याउलट कोरोनाच्या कालखंडानंतर विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीवर विपरीत परिणाम झाला. जागतिक पातळीवर शिक्षणाची अतिशय दयनीय अवस्था असणाऱ्या युगांडा, हैती यांसारख्या आफ्रिकन देशांमध्ये कारागृहात सर्वाधिक लोकांना डांबून ठेवण्यात आले आहे. तेथील क्राइम रेट जगात सर्वाधिक आहे, कारण तिथे शिक्षणाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

सध्या भारतात केंद्रीय कारागृहाची संख्या १३४, तर केंद्रीय विद्यापीठे ५६ आहेत, म्हणजे विद्यापीठांपेक्षा सेंट्रल जेलची संख्या अधिक आहे. भारतात सध्या एकूण एक हजार ३३८ विद्यापीठे आहेत. यामध्ये केंद्रीय, राज्य, खासगी आणि डीम्ड विद्यापीठांचा समावेश होतो. शासकीय किंवा अनुदानित राज्य विद्यापीठांची संख्या कमी होऊन खासगी विद्यापीठांची संख्या वाढते आहे.

२०१३-१४ ते २०२६-२७ दरम्यान सरकारने शालेय शिक्षण बजेटमध्ये ४८ टक्के कपात केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'शिक्षकांची पुरेशी संख्या सुनिश्चित करण्या'बाबत आश्वासन देणारे सरकार प्रत्यक्षात त्याच्या उलट काम करताना दिसत आहे. भारतात एकूण १४ लाख ७१ हजार शाळा आहेत. त्यापैकी १.०४ लाख शाळांमध्ये फक्त एकच शिक्षक आहे. या शाळांमध्ये ३३ लाख ८ हजार विद्यार्थी शिकत आहेत, असा नीती आयोगाचा अहवाल असून याचा फटका मुख्यत्वे ग्रामीण भागातील गरीब, मागासवर्गीय आणि मुलींना बसतो.

देशात २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभरात लाखभर शाळा बंद झाल्या असून, त्यात ९४ हजार सरकारी आणि चार हजार सरकारी अनुदानित शाळांचा समावेश आहे. त्याचवेळी ५१ हजार खासगी शाळा वाढल्या आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाचे प्रमाण कमी झाले आहे. केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या शालेय शिक्षणावरील अहवालातून ही आकडेवारी उघड झाली आहे. आयोगाने 'स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया : टेम्पोरल ॲनलिसिस अँड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वालिटी एन्हान्समेंट' हा अहवाल नुकताच जाहीर केला.

यात २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभराच्या कालावधीतील देशातील शाळांची संख्या, विद्यार्थी प्रवेश, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, विद्यार्थ्यांचे शाळांत टिकण्याचे प्रमाण, शाळांतील सुविधा, विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती अशा विविध घटकांचा अभ्यास करण्यात आला. या अहवालानुसार, दशकभरात विद्यार्थ्यांच्या शाळाप्रवेशाचे प्रमाण आठ टक्क्यांनी घटले. २०१४-१५ मध्ये २६.९५ कोटी विद्यार्थी शाळा प्रवेशित होते, तर २०२४-२५ मध्ये २४.६९ कोटी विद्यार्थी शाळेत प्रवेशित झाले. शाळा प्रवेशाचे प्रमाण घटण्यामागे कमी झालेला शालेय वयोगटातील विद्यार्थ्यांच्या लोकसंख्येतील घट, सरकारी शाळांचे विलीनीकरण, काही शाळा बंद करणे अशी कारणे देण्यात आली आहेत. 'शिक्षकांची उपलब्धता आणि त्यांच्या नियुक्तीचा शिक्षणाच्या दर्जावर लक्षणीय परिणाम होतो. शिक्षकांची कमतरता आणि नोकरी सोडण्याचे प्रमाण याचा सर्वाधिक फटका कमी उत्पन्न असलेल्या आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना बसतो. पर्यायाने विद्यार्थ्यांच्या शाळेत टिकून राहण्याच्या प्रमाणावर, पुढील वर्गात जाण्याच्या प्रमाणावर विपरीत परिणाम होतो. शिक्षण क्षेत्रात प्रवेशक्षमता, समानता, गुणवत्ता, व्यवस्थेची लवचिकता या सुधारणा दीर्घकाळासाठी पुढे नेण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गुंतवणुकीत शाश्वत आणि सुव्यवस्थित वाढ करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल,' असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षक नाहीत. केवळ शाळाच नाही, तर महाविद्यालयांबाबतही हेच धोरण असल्याचे दिसते.

ज्या धर्तीवर कमी पटसंख्येच्या शाळांचे समूह शाळेत रूपांतर केले जात आहे, त्याच धर्तीवर आता उच्च शिक्षणातही मोठे बदल होणार आहेत. विद्यापीठांवरील शैक्षणिक व प्रशासकीय भार हलका करण्यासाठी ३ ते ५ महाविद्यालये एकत्र करून समूह विद्यापीठ स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे नवीन पदनिर्मिती थांबणार असून भविष्यात सरकारी नोकऱ्या आणि अनुदानाला कात्री लागण्याची शक्यता आहे. राज्य मंत्रिमंडळाने या धोरणाला मंजुरी दिली असून त्यानुसार, ३ ते ५ अनुदानित किंवा विनाअनुदानित महाविद्यालये एकत्र करून समूह विद्यापीठ तयार करण्यात येईल. यामध्ये किमान एक अनुदानित महाविद्यालय असणे अनिवार्य असेल. राज्यात सध्या ४ हजार ८९० महाविद्यालये आहेत. त्यातील १ हजार १७० महाविद्यालये अनुदानित आहेत. समूह विद्यापीठांच्या माध्यमातून शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च कमी करण्याचा शासनाचा मूळ हेतू असल्याचे सांगितले जात असले तरी पडद्यामागील हेतू वेगळाच दिसतो.

उच्च शिक्षण व्यवस्थेचे खासगीकरण करण्याचा हेतू यातून स्पष्ट दिसत असला तरी त्यातून ग्रामीण आणि वंचित घटकातील मुला-मुलींच्या शिक्षणाची अवस्था बिकट होणार नाही यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भविष्यात गुन्हेगारी आणि कारागृहाऐवजी गुणवत्तापूर्ण शाळा आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे, एवढीच माफक अपेक्षा आहे.

## इस्लाम: भारतातील एक आधुनिक 'अस्पृश्य'

शाळांना सुटी असल्याने मुलांची आणि नागरिकांची गर्दी होते म्हणून पुण्यातील सारसबाग दिनांक २८ आणि २९ मे, २०२६ रोजी बंद ठेवण्यात आली. संपूर्ण मे महिना मुलांना, शनिवारी-रविवारी पालकांना सुटी असतांना याच दिवशी बाग बंद का? प्रतिबंधात्मक आदेश लागू होते असे म्हणावे तर सारसबागच बंद का? सारसबागेतील मंदिर चालू कसे? या प्रश्नांची अधिकृत आणि तर्कसंगत उत्तरे कोणतीही यंत्रणा देणार नाही. दिनदर्शिकेतील २८ मे, २०२६ या तारखेत या प्रश्नांची उत्तरे मिळतील. या दिवशी नेमका बकरी ईद हा सण होता. मुस्लिम बांधव आपला सण साजरा करून बागेत फिरायला येत असतात. त्यांना बागेपासून 'दूर' ठेवण्यासाठी हा 'सारसबाग बंद'चा खटाटोप. यावरून मुस्लिमांना बहिष्कृत करून 'दूर' ठेवण्याच्या प्रक्रियेचा हा एक भाग आहे ही शंका खरी ठरते. या विषयावर एक दृष्टिक्षेप टाकू या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'अस्पृश्य पूर्वी कोण होते?' या शोधग्रंथात अस्पृश्यतेवर महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्यासाठी संविधानात अनुच्छेद १७ मध्ये विशेष तरतूद करून कायद्याने अस्पृश्यता संपुष्टात आणली आहे. परंतु, गेल्या दहा-बारा वर्षांपासून, आपल्या डोळ्यासमोर धर्मनिरपेक्षता, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संवैधानिक मूल्यांना पायदळी तुडवून, अस्पृश्यतेच्या कटू इतिहासाची पुनरावृत्ती होतांना पहावे लागत आहे. या वेळी अस्पृश्य होऊ घातलेला वर्ग आहे भारतातील मुस्लिम. धार्मिक विद्वेषाच्या आधारावर मतांचे ध्रुवीकरण करून सत्तेत आलेल्या पक्षाचा आणि संलग्न संस्था-संघटनांचा मुस्लिम-द्वेषयुक्त अजेंडा आणि त्याची कठोर अंमलबजावणी, त्याकडे सरकारने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, यामुळे भारतीय मुस्लिम आधुनिक अस्पृश्य जमात होऊ घातला आहे. विशेष म्हणजे डॉ.आंबेडकर यांनी अस्पृश्य जातीच्या उत्पत्तीची जी कारणे सांगितली आणि आता मुस्लिमांना बहिष्कृत करण्यासाठी वापरली जाणारी पद्धत, यात कमालीचे साम्य दिसून येते. भारतातील अस्पृश्य हे त्या काळी युद्धात पराभूत झालेले उद्ध्वस्त लोक (ब्रोकन मेन) होते.

# प्रादेशिक पक्ष अडचणीत

**देशातील प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व सध्या पणाला लागले आहे. त्यामुळे विविध प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे, असे पर्याय सुचवले जात आहेत. पण, भाजपच्या झंझावातासमोर हे पक्ष टिकतील का? हा मोठा प्रश्न आहे.**

देशात सध्या राजकीय वातावरण बदलत आहे. बंगालच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. प. बंगालच्या निवडणूक निकालानंतर ममता दीदी या अल्पमतात आल्या असून त्यांनी आपला तृणमूल पक्ष काँग्रेसमध्ये विसर्जित करावा, अशी ऑफर सोनिया गांधींनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष मजबूत व्हावा यासाठी शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत धावून आले असून शरद पवार यांनी आपला राहिलेला राष्ट्रवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याबाबत प्रस्ताव संजय राऊत यांनी ठेवला आहे. यामागे निव्वळ नरेंद्र मोदी यांच्याबद्दलचा द्वेष आहे. परंतु संजय राऊत हेही एका विघटन झालेल्या शिवसेना उबाठा पक्षाचे प्रवक्ते आहेत. त्यांनीही उरलेला शिवसेना पक्ष हा काँग्रेसमध्ये विसर्जित करावा अशी सूचना केली नसली तरी भाताची परीक्षा एका शितावरून करता येते. काँग्रेस प्रबळ व्हावी हे शिवसेना उबाठा प्रवक्त्यांना वाटत असेल तर प्रथम ही सूचना त्यांनी उद्धव ठाकरे यांना करावी.



शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे म्हणणे होते की, शिवसेना जेव्हा काँग्रेससोबत जाईल तेव्हा मी माझी शिवसेना बरखास्त करीन. इथे तर त्यांच्याच पक्षाचे प्रवक्ते काँग्रेसशी भलामण करीत आहेत.

देशात सध्या प्रादेशिक पक्ष संपुष्टात येत आहेत. अशावेळी संजय राऊत यांनी उबाठाची काळजी करायची की काँग्रेसची, हा प्रश्न पडला आहे. प. बंगालमध्ये आज काय स्थिती आहे. तृणमूलचे आमदार, २०-२२ खासदार एनडीएत चालले आहेत, भाजपकडे चालले आहेत, तर उबाठाचे ९ पैकी ७ खासदार सध्या शिंदे यांच्या संपर्कात आहेत, तर दक्षिणेत तमिळनाडूत डीएमकेने काँग्रेसची साथ सोडली आहे. त्यांचा गटही भाजप-एनडीएकडे चालला आहे. उलट अशावेळी उबाठाने आपले संख्याबळ वाढविण्याचा नव्हे तर आहे त्यांना रोखण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. येथे मात्र संजय राऊत यावर भाष्य करीत नाहीत, तर काँग्रेस पक्षाची वकिली करीत आहेत हे उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का? एक मात्र निश्चित की, आदित्य ठाकरे संजय राऊतांपासून दूर आहेत. परंतु संजय राऊत यांना सकाळी ९ वाजता मीडियासमोर यायचे असते मग राज्यातील, देशातील नव्हे तर जगाचे विषय असतील त्यावर भाष्य हे संजय राऊतांचे असेल यात वाद नाही.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकांचा हंगाम सुरू आहे. शिवसेना उबाठाचे उमेदवार मैदान सोडून पळत आहेत, तर अनेक ठिकाणी काँग्रेस-राष्ट्रवादी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मैदान सोडले आहे. १७ जागांपैकी १७ जागा महायुती जिंकेल असे म्हणत असताना महाविकास आघाडीची दाणादाण झाली आहे. म्हणे उमेदवार १५० कोटींना विकत घेतले. शिंदे यांच्यावेळी ५ कोटी-खोक्याचा आरोप होता. त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका झाल्या. शिंदे यांच्या शिवसेनेची ताकद ४० वरून ५३ वर पोहचली.

सध्या भाजप-काँग्रेस वगळता सर्वच राजकीय पक्षांचे ध्रुवीकरण सुरू आहे. प्रादेशिक पक्षांची अवस्था कठीण झाली आहे. अशावेळी काँग्रेसमध्ये विलीनीकरण व्हावे असे प्रस्ताव येत आहेत. शरद पवारांचे काही खरे नाही. परवा झालेल्या राष्ट्रवादी मेळाव्यात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांची स्तुती केली, तर दुसऱ्या बाजूला मोदींच्या परदेशी निर्णयावर त्यांचे स्वागत केले. पवार काल काय बोलतील, आज काय आणि उद्या काय बोलतील याचा नेम राहिला नाही. २०२९ मध्ये ते भाजपबरोबरही जाऊ शकतात.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# एकल महिला धोरणासाठी १७ जून रोजी जिल्हास्तरीय बैठक : ठोस उपाययोजनांसह प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***अमरावती*** – महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक स्वतंत्र आणि व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत असून, हे धोरण अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने बुधवार, दिनांक १७ जून




२०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद अमरावतीच्या पंजाबराव देशमुख सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीमध्ये एकल महिलांचे प्रश्न केवळ मांडण्याऐवजी त्यावर ठोस मार्ग काढण्याच्या उद्देशाने चर्चा केली जाणार असून, जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांना या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.

या धोरणाचा मसुदा तयार करताना केवळ त्रोटक स्वरूपातील मते किंवा समस्या मांडण्याऐवजी, त्या समस्यांवर शासनाने नेमक्या कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणती नवीन योजना सुरू करावी, विद्यमान योजनांमध्ये काय बदल करावेत आणि आवश्यकतेनुसार कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात, याविषयी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. नागरिकांनी पाठवणाऱ्या या प्रस्तावामध्ये संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि त्याचे अपेक्षित परिणाम या गोष्टींचा प्रामुख्याने समावेश असावा.

ज्या नागरिकांना किंवा संस्थांना बैठकीव्यतिरिक्त आपले अभिप्राय थेट प्रशासनापर्यंत पोहोचवायचे आहेत, त्यांच्यासाठी प्रशासनाने ८२०८५८१९१५ हा अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक जाहीर केला असून, प्राप्त होणाऱ्या सर्व नाविन्यपूर्ण सूचना व अभिप्रायांचा 'एकल महिला धोरणाचा' मसुदा तयार करताना योग्य तो विचार केला जाईल, तरी अमरावती जिल्ह्यातील सर्व संबंधित घटकांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# देशात बेरोजगारी दरात किंचित वाढ

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***नवी दिल्ली*** – देशातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील बेरोजगारीचा दर मे महिन्यात ५.५ टक्क्यांवर नोंदवला गेला. तो मे २०२५ मधील ५.६ टक्क्यांच्या तुलनेत किंचित कमी असला, तरी एप्रिल २०२६ मधील ५.२ टक्क्यांच्या तुलनेत वाढल्याचे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) ताज्या 'नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण' अहवालातून सोमवारी स्पष्ट झाले.

सदर अहवालानुसार, मे महिन्यात ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर ५.१ टक्क्यांवर पोहोचला असून तो एप्रिलमधील ४.६ टक्क्यांच्या तुलनेत वाढला आहे. उलट, शहरी भागातील बेरोजगारीचा दर ६.६ टक्क्यांवरून, ६.४ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. विशेष म्हणजे, शहरी बेरोजगारीचा हा मे २०२५ नंतरचा सर्वात नीचांकी स्तर आहे. श्रमशक्ती सहभाग दर मे महिन्यात ५४.४ टक्क्यांवर नोंदवला गेला. एप्रिलमध्ये तो ५५ टक्के होता.

ग्रामीण भागात हा दर ५६.६ टक्के, तर शहरी भागात ४९.८ टक्के राहिला. वर्षभराच्या तुलनेत एकूण श्रमशक्ती सहभाग दरात ०.४ टक्के अंकांची घट झाली आहे. तरी विशेष म्हणजे महिलांच्या सहभाग दरात फारसा बदल दिसलेला नाही. मे २०२६ मध्ये महिला सहभाग दर ३२.८ टक्के राहिला. ग्रामीण भागात तो ३६.७ टक्के, तर शहरी भागात २४.८ टक्के नोंदवला गेला. मात्र, मे २०२५ च्या तुलनेत महिला सहभाग दरात ०.४ अंकांची किरकोळ घट झाली आहे.

दरम्यान, रोजगारित लोकसंख्येचे प्रमाण दर्शविणारे कामगार–लोकसंख्या गुणोत्तर अर्थात 'वर्कर पॉप्युलेशन रेशो' मे महिन्यात ५१.४ टक्क्यांवर आला. एप्रिलमध्ये तो ५२.२ टक्के होता. ग्रामीण भागात हा दर ५३.८ टक्के, तर शहरी भागात ४६.६ टक्के राहिला.

स्व.नंदकिशोर हरिकिसनजी पनपालिया स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा

# यंदाचा सेवावृत्ती पुरस्कार डॉ.विजय देशमुख यांना जाहीर

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – शहरातील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ.विजय शरद देशमुख यांना यंदाचा स्व.नंदकिशोर हरिकिसनजी पनपालिया स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा सेवावृत्ती पुरस्कार जाहीर झाला आहे, डॉ.देशमुख यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

डॉ.विजय देशमुख हे गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असून त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या जलसंवर्धन वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विशेष योगदान बद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे. डॉ.विजय देशमुख यांची वैद्यकीय सेवा अनेकांनी अत्यंत जवळून बघितली असून त्यांचे वडील स्व.शरद देशमुख यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी आजपर्यंत मार्गक्रमण केले आहे. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये सायफन पद्धतीने पाणी आणुन एक आगळावेगळा प्रयोग त्यांनी करून दाखविला आणि त्यांच्या प्रयोगाची दखल घेत केंद्र आणि राज्य शासनाने आतापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार दिले आहेत. एवढेच नव्हे तर शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सुद्धा अनेक शेतकऱ्यांना एकत्रित करून उद्योग उभारण्याचं काम सुद्धा त्यांच्याच पुढाकाराने सुरू आहे.

त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत नंदकिशोर पालिया मित्र मंडळाच्या वतीने त्यांना यावर्षीच्या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. येत्या २१ जून रोजी हा पुरस्कार शहरातील स्व.विनायकराव गोधने आयएमए हॉल येथे त्यांना प्रदान करण्यात येणार असून प्रसिद्ध उद्योजक माधवराव देशपांडे यांच्या शुभहस्ते तसेच आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांचे उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. याप्रसंगी पुसदचे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, नगराध्यक्ष ईश्वर सलामे आणि मुख्याधिकारी गजानन भोयर हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत. डाविजय देशमुख यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

# कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करुन सरसकट २ लाखांची कर्जमाफी करा : तहसिलदारांना निवेदन

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**वरुड** – कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करुन सरसकट कर्जमाफी करा, अशी मागणी करणारे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तहसिलदार यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून ही योजनेतील जाचक अटी–शर्ती बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे तसेच राज्यभरातील लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट आहे. परिणामी संबंधित शासन निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे.

या योजनेत सन २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेले अल्पमुदत पीककर्जाची २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला परंतु ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे, त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे.

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करुन सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी, एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेत लाखांहून अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना २ लाखांवरील रक्कम आधी भरण्याची अट न घालता सरकारने सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करावी, २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करुन सर्व शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी लागु करावी, प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अट रद्द करावी, २०१७ च्या कर्जमाफीसाठी पात्र असुनही केवळ कागदपत्रांअभावी लाभापासून वंचित राहिलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना तत्काळ कर्जमाफीचा लाभ द्यावा.

पीक विमा योजनेतील शेतकरीविरोधी जाचक अटी रद्द करुन १ रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरु करावी, पेरणीपुर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करुन शेतकऱ्यांच्या खात्यात आवश्यक रक्कम जमा करावी, जेणेकरुन त्यांना पेरणीसाठी आर्थिक मदत मिळेल, ही कर्जमाफी न झाल्यास आम्हा शेतकऱ्यांना सामुहिक आत्मदहनाची परवानगी देण्यात यावी.

तसेच या जाचक अटी शर्ती शिवाय कर्जमाफी झाली नाही तर शासनाविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा ईशारा माजी जि.प.सभापती गिरीश कराळे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बहुरुपी, माजी तालुकाध्यक्ष राजाभाऊ कुकडे, रा.कॉ.जिल्हा उपाध्यक्ष समिर गौस, रायुकॉ संघटन सचिव आशिष श्रीराव, बाबाराव इंगळे, माजी नगरसेवक संजय डफरे, वाई खुर्दचे सरपंच रुपेश फुसे, सोपान ढोले, किशोर भोंड, सुरज वडस्कर, तेजस बेलसरे, विरेंद्र देशमुख, योगेश देशमुख, राधेश्याम धुर्वे, अनिरुद्ध देशमुख, किशोर हेलोडे, संजय वानखडे, हिदायत खान, प्रितम सुपले, अजय देशमुख, प्रफुल काकडे, प्रकाश बेलखेडे, कपिल अकर्ते यांनी दिला आहे.

जय हरी टाईल्सच्या शोरुमचा

# आज आमदार उमेश यावलकर यांचे हस्ते शुभारंभ

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**वरुड** – शहरात नव्याने धनोडी रस्त्यावरील पदमावती नगर परिसरामध्ये जय हरी टाईल्स नावाच्या नवीन शोरुमचा शुभारंभ उद्या १६ जुन रोजी होवु घातला आहे.

या शोरुमचे उदघाटन १६ जुन रोजी सायंकाळी ७ वाजता आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर व प्रसिध्द स्त्रि् रोग तज्ञ डॉ.मनोहर आंडे यांचे हस्ते होणार असून याप्रसंगी ह.भ.प.गौरव महाराज (आळंदी) व ह.भ.प.श्रीकांत शास्त्री भुसकडे हिरुरकर (आळंदी) हे विशेष अतिथी म्हणुन तर प्रसिध्द शल्यचिकित्सक डॉ.सुधाकर बंदे, हरी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे, पुजा ट्रान्सपोर्ट पांढुर्णाचे संचालक हरिष सारडा यांचे उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

या शोरुमच्या शुभारंभ कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जय हरी टाईल्सचे संचालक उमेश कांडलकर, रोशनी कांडलकर यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

स्व.नंदकिशोर पनपालिया यांच्या व्दितीय स्मृतिप्रित्यर्थ

# २१ जुनला सेवाव्रती पुरस्कार सोहळयाचे आयोजन

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक स्व.नंदकिशोर पनपालिया यांच्या व्दितीय स्मृतिप्रित्यर्थ येत्या २१ जुन रोजी स्व.विनायकराव गोधने आय.एम.ए.हॉल येथे सेवाव्रती पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या सोहळयाचे पुरस्कार वितरण नागपूर येथील प्रसिद्ध उद्योजक तथा श्री केदारेश्वर संस्थानचे अध्यक्ष माधवराव देशपांडे यांचे हस्ते होणार असून आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर यांचे अध्यक्षेत होणारा हा कार्यक्रम पुसदचे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, नगराध्यक्ष इंजी.ईश्वर सलामे, न.प.मुख्याधिकारी गजानन भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

स्व.नंदकिशोर पनपालिया यांनी धामणगांव रेल्वे हून वरुन वरूडला येवून व्यवसायासह सामाजिक व धार्मिक कार्य त्यांनी समाजोपयोगी केलेत. सेवाभाव कायम ठेवून ते आयुष्य जगले, त्यांचा हा वसा पुढील पिढीला मिळावा व समाज सेवेचे हे व्रत अखंड चालू रहावे या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे त्यांच्या स्मृतित स्व.नंदकिशोर पनपालिया स्मृति प्रित्यर्थ 'सेवाव्रती पुरस्कार' यंदा शहरातील प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय शरद देशमुख यांना त्यांच्या जलसंवर्धन, वैद्यकिय तसेच सामाजीक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन नंदकिशोर पनपालिया मित्र मंडळाच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकादारे करण्यात आले आहे.

# भाजपच्या झाडावर बसलेत म्हणून वनमंत्री गणेश नाईकांचे माकड चाळे, प्रकाश महाजन भडकले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाजपच्या झाडावर बसलेत म्हणून वनमंत्री गणेश नाईकांचे माकड चाळे सुरू आहेत. वनमंत्र्यांनी माकड चाळे थांबवावेत, असं म्हणत शिवसेना प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी गणेश



नाईकांवर जहरी टीका केली आहे. दुसऱ्याची उंची कमी केली म्हणून ती कमी होत नसते. असेही ते म्हणाले. ठाणे येथील कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांना नाव टाळल्याने प्रकाश महाजन हे आक्रमक झाल्याचे बघायला मिळाले. लोकप्रतिनिधींचे नाव टाळल्यामुळे आयुक्तांना नोटीस बजावायला हवी, असेही महाजन म्हणाले. गणेश नाईक यांनी यापूर्वीही बिबट्या बंदोबस्त करण्यासाठी शेळ्या सोडण्याचे फर्मान काढले होते. त्यावरूनही प्रकाश महाजन यांनी लक्ष्य करत टीका केलीय.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार फुटणार आणि ते शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा राजकीय वतुर्ळात रंगल्या आहेत. रविवारी 'मातोश्री' वर झालेल्या बैठकीला केवळ ५ खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते, तर ४ खासदार ऑनलाइन जोडले गेले होते. यानंतर खासदार संजय देशमुख यांनी दिल्ली गाठून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे. या सर्व घडामोडींवर बोलताना प्रकाश महाजन म्हणाले कि, डॉक्टरांच्या मनात आलं की योग्य वेळी ऑपरेशन होणार. असं म्हणत त्यांनी ऑपरेशन टायगरवरून सूचक वक्तव्य केलं. ६० व्या वर्धापन दिनानिमित्य दोन्ही शिवसेनेकडून जय्यत तयारी वर्धापन दिनानिमित्त एकनाथ शिंदेंची शिवसेना मुंबईत मोठं शक्ती प्रदर्शन करणार आहे. गोरेगावच्या नेस्को सेंटर येथे शिंदेंच्या शिवसेनेचा वर्धापन दिनाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

# वांद्रेतील मेट्रो २बीच्या बांधकामस्थळी आग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## जळते अवशेष रस्त्यावर पडल्याचा व्हिडीओ व्हायरल

**मुंबई** – मुंबईतील वांद्रे रिक्लेमेशन उड्डाणपुलाजवळ सुरू असलेल्या मेट्रो २बी प्रकल्पाच्या बांधकामस्थळी सोमवारी रात्री आग लागल्याची घटना घडली. उंचावरील मेट्रो मार्गावरून जळणारे अवशेष खालील वाहतुकीजवळ पडल्याने काही काळ वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

व्हायरल व्हिडीओमुळे खळबळ ही घटना सोमवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. वांद्रे पूर्व आणि वांद्रे पश्चिमेला जोडणाऱ्या महत्त्वाच्या



मार्गावरील मेट्रो २बीच्या उभारण्यात येत असलेल्या केबल-स्टेड भागात आग लागल्याचे समोर आले. घटनास्थळावरील व्हिडीओमध्ये उंचावरील संरचनेतून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा दिसत असून, त्याचवेळी खालील रस्त्यावर वाहतूक सुरू असल्याचेही दिसून आले.

एमएमआरडीएचे स्पष्टीकरण

घटनेनंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) अधिकृत निवेदन जारी केले. त्यानुसार, रात्री १०.५२ वाजता मेट्रो २बी प्रकल्पाच्या पी-४०० (डावीकडील बाजू), पायलन-४च्या चौथ्या स्तरावर आग लागल्याची माहिती मिळाली होती.

एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या लाकडी शटरिंग साहित्याला आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच प्रकल्पाच्या आपत्कालीन पथकाने आणि मुंबई अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.

जीवितहानी नाही, चौकशी सुरू या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मेट्रोच्या संरचनेचेही कोणतेही नुकसान झाले नसल्याचे एमएमआरडीएने स्पष्ट केले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून त्याबाबत सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे. सुरक्षेच्या नियमांबाबत कठोर भूमिका प्रकल्पस्थळी सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, अशी भूमिका एमएमआरडीएने मांडली आहे.

# जोगेश्वरी रेल्वे टर्मिनसचे ५५ टक्के काम पूर्ण

**७६.४८ कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे जानेवारी २०२७ पर्यंत लोकार्पण होण्याची शक्यता**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पश्चिम रेल्वेचा महत्त्वाकांक्षी ७६.४८ कोटी रुपयांचा जोगेश्वरी कोचिंग टर्मिनस प्रकल्प वेगाने पुढे सरकत असून, तो जानेवारी २०२७ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

प्लॅटफॉर्मवरून परतणाऱ्या मेल आणि एक्स्प्रेस गाड्या हाताळण्यासाठी हे नवीन टर्मिनस विकसित केले जात आहे. यामुळे प्रमुख टर्मिनसवरील गाड्यांची गर्दी कमी होईल आणि उपनगरीय नेटवर्कवरील गाड्यांच्या वाहतुकीत सुधारणा होईल.

रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पाने आतापर्यंत सुमारे ५५ टक्के प्रगती साध्य केली आहे. पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक राम श्राय पांडे यांनी हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि कामकाज सुरू करण्यासाठी जानेवारी २०२७ ही तारीख निश्चित केली आहे.

हे टर्मिनस सुरू झाल्यानंतर लांब पल्ल्याच्या गाड्या आणण्यासाठी, त्या उभ्या करण्यासाठी आणि रवाना करण्यासाठी हक्काची पायाभूत सुविधा उपलब्ध होईल. यामुळे गाड्यांचा वक्तशीरपणा आणि परिचालन कार्यक्षमता सुधारण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पांतर्गत मुख्य नागरी कामे बऱ्याच अंशी पूर्ण झाली आहेत. तळमजला अधिक दोन मजल्यांची संबंधित इमारत जवळपास ९० टक्के पूर्ण झाली असून, तिचे संरक्षणात्मक काम संपले आहे आणि अंतर्गत फिनिशिंगचे काम सुरू आहे.

तळमजला अधिक तीन मजली स्टेशन इमारतीचे काम सुमारे ४० टक्के पूर्ण झाले असून, छताचा स्लॅब आधीच टाकण्यात आला आहे. सर्व तीन प्लॅटफॉर्मच्या भिंतींचे बांधकाम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले आहे, तर प्लॅटफॉर्मवरील छताच्या संरचनेचे कामही त्याच टप्प्यावर पोहोचले असून खांब उभारण्यात आले आहेत.

पश्चिम उपनगरात अतिरिक्त टर्मिनस सुविधा उपलब्ध करून देऊन मुंबईच्या रेल्वे पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी हे नवीन कोचिंग टर्मिनस अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे. सध्या अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या व्यस्त टर्मिनसवर अवलंबून असल्याने, जोगेश्वरी येथील सुविधेमुळे गाड्यांचे परिचालन सुलभ होईल आणि भविष्यातील सेवांच्या विस्तारासाठी अधिक लवचिकता मिळेल.

# एकनाथ शिंदेंचे नाव वगळल्याने महायुतीत संघर्ष : शासकीय कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेमुळे वाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे/नवी मुंबई** – नवी मुंबईतील शासकीय कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव वगळण्यात आल्याच्या आरोपावरून महायुतीतच नव्या वादाला तोंड फुटले आहे.

ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी याप्रकरणी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री गणेश नाईक यांच्यावर जोरदार टीका करत, 'नवी मुंबईत भाजप नाही, तर 'नाईक जनता पार्टी' चालते, अशी टीका केली.

म्हस्के म्हणाले की, नवी मुंबईत 'हम करे सो कायदा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. 'ते पक्षालाही मानत नाहीत, नेतृत्वालाही मानत नाहीत.

त्यांचा इतिहासही तसाच राहिला आहे. मंदा म्हात्रे यांनाही त्यांनी कधी मान दिला नाही. पक्षसंघटनेपेक्षा स्वतःचा निर्णय अंतिम मानण्याची त्यांची पद्धत आहे,' असा आरोप त्यांनी केला. निमंत्रण पत्रिकेतील वादावर म्हस्के यांनी दावा केला की, कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या



कच्च्या पत्रिकेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव समाविष्ट होते. मात्र नंतर ते जाणीवपूर्वक काढून टाकण्यात आले. 'मी स्वतः आयुक्तांशी चर्चा केली. कच्च्या पत्रिकेत शिंदे साहेबांचे नाव होते. मात्र महापौर आणि गणेश नाईक यांनी मिळून ते वगळले. हे केवळ राजकारण असून मित्रपक्षाचा अपमान आहे,' असा आरोप त्यांनी केला. 'कॅथलॅब, डायलिसिस सेंटरसारख्या अनेक महत्त्वाच्या सुविधा उभारण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच या योजना प्रत्यक्षात आल्या. आचारसंहितेमुळे उद्घाटन लांबले म्हणून आता इतरांनी त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही,' असे ते म्हणाले.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४५/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

अर्जदार :- १) पुरुषोत्तम माधवराव कळसकर, वय अं.४७ वर्ष, धंदा-मजुरी, २) ज्ञानेश्वर माधव कळसकर, वय अं.४५ वर्ष, धंदा-मजुरी, ३) रंजना सुनील डाहाके, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.३ रा.तळेगाव ठाकुर, ता.तिवसा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मय्यत माधव दौलत कळसकर व देवकु माधव कळसकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३०/२०२६** **ने.ता.२३/०६/२०२६**

अर्जदार :- १) माया राजेश कनाठे, वय अं.३५ वर्ष, धंदा-घरकाम, २) तनिषा राजेश कनाठे, वय अं.१३ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) युवांश राजेश कनाठे, वय अं.०३ वर्ष, धंदा-शिक्षण, ४) व्दारका साहेबराव कनाठे, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ ते ४ रा.तिवरखेड, ता.प्रभात पट्टन

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मय्यत राजेश साहेबराव कनाठे, रा.तिवरखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२३/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे, २ रे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४४/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

अर्जदार :- १) शालु सुरेश कपिले, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम, २) विनोद सुरेश कपिले, वय अं.३९ वर्ष, धंदा-मजुरी, ३) मंजु मंगेशराव राजगुरे, वय अं.३० वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.३ रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मय्यत सुरेश शंकर कपिले, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सौंदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४१/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) राजेंद्र गोविंदराव काळे, वय अं.५२ वर्ष, धंदा- शेती, २) रामेश्वर गोविंदराव काळे, वय अं.४७ वर्ष, धंदा- शेती, ३) निलेश गोविंदराव काळे, वय अं.४४ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ३ रा.धनोडी, ता.वरुड, ४) लिला चंद्रशेखर सुपले, वय अं.७० वर्ष, धंदा- गृहिणी, रा.माळीपुरा, हिवरखेडा, ता.मोर्शी, ५) वनिता चंद्रकांत खेरडे, वय अं.५६ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.गणेश नगर, आंडेवाडी, वरुड, ता.वरुड, ६) अनिता सुभाष थेलकर, वय अं.५० वर्ष, धंदा- गृहिणी, रा.अंबाडा, ता.मोर्शी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गोविंदा उर्फ गोविंदराव बारकाजी काळे व मयत शांताबाई गोविंदा उर्फ गोविंदराव काळे, रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **११/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून : १० जुलैपर्यंत चालणार कामकाज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पुढील आठवड्यात २२ जूनपासून सुरुवात होत असून तीन आठवडे चालणाऱ्या या अधिवेशनात विधान परिषदेच्या नव्या उपसभापतींची निवड केली जाणार आहे.




सध्या सुरू असलेल्या विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीचे निकाल लागून त्याची अधिसूचना निघाल्यानंतर उपसभापती निवडीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत १३ मे २०२५ रोजी संपली. त्यामुळे सध्या रिक्त असलेले उपसभापतीपद हे पावसाळी अधिवेशनात भरले जाणार आहे. विधान परिषदेच्या उपसभापतिपदावर शिवसेना शिंदे गटाचा दावा आहे. विधान परिषद सभापती, विधानसभा अध्यक्ष ही दोन्ही पदे भाजपकडे आहेत. तर विधानसभेचे उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे आहे. त्यामुळे विधान परिषदेचे उपसभापतीपद शिवसेना शिंदे गटाकडे जाण्याचे निश्चित असून या पदासाठी डॉ नीलम गोऱ्हे यांचे नाव आघाडीवर आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |

# अवैध जुगार अड्डयावर मोर्शी पोलिसांचा मोठा छापा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## १२ जणांवर कारवाई : १९.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी** - अवैध धंद्यांविरोधात मोर्शी पोलिसांनी धडक मोहीम राबवत ग्राम उडखेड परिसरातील शेतशिवारात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर छापा टाकला.

या कारवाईत १२ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून रोख रक्कम, वाहने, मोबाईल फोन व जुगार साहित्य असा तब्बल १९ लाख २० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार अवैध दारू विक्री, जुगार व इतर बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई सुरू असताना




मोर्शी पोलिसांना गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्याआधारे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने उडखेड परिसरात छापा टाकून जुगार खेळणाऱ्या १२ आरोपींना रंगेहात पकडले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी १० मोटारसायकली (७.२० लाख रुपये), एक चारचाकी वाहन (१० लाख रुपये), ४८ हजार ८५० रुपयांची रोख रक्कम, ९ अँड्रॉइड मोबाईल (१.५१ लाख रुपये), ताशाच्या पत्त्यांचे पाच बॉक्स तसेच इतर साहित्य जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १९.२० लाख रुपये इतकी आहे.या प्रकरणी महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून परिसरात पोलिसांच्या कारवाईचे स्वागत होत आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत पोउपनि तुषार चव्हाण तसेच पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, ऋषीकेश टेकाडे, नयन शाहकार आणि अथर्व कोहळे यांनी सहभाग घेतला. अवैध धंद्यांविरोधातील मोर्शी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरात चांगलीच चर्चा रंगली असून अशा बेकायदेशीर कृत्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

# अन्नभेसळ करणाऱ्यांना ईडीचा दणका



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - अन्नभेसळ आणि प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने वसई-विरारमध्ये धडक कारवाई सुरू केली आहे. गेल्या १८ दिवसांत विविध ठिकाणी टाकलेल्या धाडीत १८ दुकाने सील करण्यात आली असून सुमारे १४ लाख रुपयांचा भेसळयुक्त आणि संशयित माल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अन्नभेसळ करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार, वसई-विरार महानगरपालिका हद्दीत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. खाद्यतेलाचा मोठा साठा जप्त एफडीएच्या पथकांनी तीन वेगवेगळ्या आस्थापनांवर छापे टाकून ४ हजार ७९८ किलो खाद्यतेल जप्त केले. या तेलाची किंमत ९ लाख १४ हजार ६९८ रुपये इतकी आहे. हे तेल जुन्या आणि पुनर्वापर केलेल्या डब्यांमध्ये साठवून ठेवण्यात आले होते. संबंधित तेलाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

# अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन विनयभंग

## वडाळा येथील २२ वर्षीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - ट्युशनला जाणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन ती अल्पवयीन असल्याचे माहीत असतांनाही माझे तुझ्यावर प्रेम आहे, आपण लग्न करु, असे म्हणत तिचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन बेनोडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३७ वर्षीय फिर्यादी महिलेची १४ वर्षांची मुलगी ही शिक्षण घेत असुन ती नियमितपणे ट्युशनला जाते. ती ट्युशनला जात-येत असतांना वरुड



तालुक्यातील वडाळा येथे राहणारा आरोपी रोशन उर्फ गोपी रामकिसन धुर्वे (२२) याने मुलीच्या इच्छेविरुद्ध तिचा पाठलाग केला तसेच तिला रस्त्यात अडवुन लग्नाची गळ घालत तिचा विनयभंग केला. या त्रासाला कंटाळुन पीडित मुलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितला. त्यानंतर फिर्यादी महिला व त्यांच्या पतीने तात्काळ बेनोडा पोलिस स्टेशन गाठुन आरोपीविरुद्ध रीतसर रिपोर्ट दिला.

या प्रकरणी ३७ वर्षीय फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन बेनोडा पोलिसांनी आरोपी रोशन उर्फ गोपी रामकिसन धुर्वे (२२), रा.वडाळा, ता.वरुड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकराणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बनोडा पोलिस करीत आहे.







